इतिहास विभाग

नबीरा महाविद्यालयात काटोल, जि. नागपूर

# शैक्षणिक सहलीचा अहवाल

सत्र – 2015–2016

पदव्युत्तर इतिहास विभागाच्या नविन अभ्यासक्रमानुसार आमच्या महाविद्यालयातर्फे दरवर्षी ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्याच्या उद्देशाने शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात येते. यावर्षी 19 मार्च 2016 ते 22 मार्च 2016 या कालावधीत मध्यभारतातील ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांना भेटी देण्यात आल्या. नबीरा महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख आणि महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आर.आर. धोटे सर हयांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 19 मार्च 2016 रोज शनिवारला महाविद्यालयाच्या परिसरातुन सहलीकरीता प्रस्थान करण्यात आले.

सर्वप्रथम महानुभाव पंथीयांची काशी म्हणून ओळख असलेल्या रिद्धपूरला आम्ही भेट दिली. प्राध्यापक मंडळींनी विद्यार्थ्यांना रिद्धपूरचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्व पटवून दिले. त्यानंतर विदर्भाचे नंदनवन असलेल्या चिखलदरा येथील प्रेक्षणिय स्थळांना भेटी देण्यात आल्या. तेथील गाविलगड किल्ल्याविषयी डॉ. धोटे सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गाविलगडावरून आम्ही मेळघाट अभयारण्याची सैर केली व पुढील प्रवासाकरीता धारणीचा जंगल व वण्यप्राण्यांचे दर्शन घेत मध्यप्रदेशच्या सीमेत प्रवेश केला. रात्री दादाजी धुनिवाले हयांचा दरबार असलेल्या खंडवा या स्थळी आम्ही पोहचलो. तेथील दर्शन घेवून ओंकारेश्वर या ठिकाणी आम्ही पहीला मुक्काम केला.

दिनांक 20 मार्च 2016 रोज रविवारला सकाळी आम्ही सर्व मंडळी ओंकारेश्वराच्या दर्शनाला गेलो. नर्मदा नदीचे भव्य पात्र व ओंकारेश्वराच्या भौगोलिक परिसराचा आम्ही मनमुराद आनंद लुटला. ओंकारेश्वराच्या पुरातन मंदिराच्या इतिहासाविषयी डॉ. धोटे सरांनी यावेळी आम्हाला सविस्तर माहिती दिली. त्यांतर दूपारी 1.00 वाजता आमची सहल महेश्वर या ठिकाणी पोहचली. महेश्वर हे ऐतिहासिक स्थळ राणी अहिल्याबाई होळकर यांची राजधानी असल्यामूळे आमच्या करीता तेथील भेट म्हणजे एक पर्वणीय ठरली. राणी अहिल्याबाईचा राजवाडा, पुजास्थळ, राजदरबार, होळकरघराण्यातील राजे महाराजासंबधी माहिती मिळवीत नर्मदा नदीच्या तीरावर बांधण्यात आलेल्या विस्तीर्ण घाटाचे चीत्र खरोखरच अचंबित करणारा ठरले. सर्वांनी येथील मंदिरे व कलाकृतीचा सविस्तर अभ्यास करून तेथील ऐतिहासिक ठेवा नोंदवून घेतला. त्यांनतर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मभूमी असलेल्या महू येथील डॉ. आंबेडकरांच्या स्मारकाला भेट देण्यात आली. तेथील प्रत्येक


18.Mar.2016